## (ब) यूएनच्या स्थापनेची पार्श्वभूमी

दुसरे महायुद्ध चालू असतानाच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी आणि जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून वाचविण्यासाठी एका सक्षम आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचा विचार पुढे आला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी १ जानेवारी १९४२ ला "संयुक्त राष्ट्रे" (United Nations) या संकल्पनेची घोषणा केली. नवीन आंतरराष्ट्रीय संघटना संयुक्त राष्ट्र संघटना (United Nations Organizations UNO) या नावाने ओळखली जाईल, असे ठरविण्यात आले. **(स्थापनेच्यावेळी जरी संयुक्त राष्ट्र संघटना असे नाव असले तरी पुढे त्यात बदल करण्यात आला. सध्या संयुक्त राष्ट्रे हा शब्दप्रयोग प्रचलित आहे.)** दुसऱ्या महायुद्धानंतरची आंतरराष्ट्रीय परिस्थिती, महायुद्धात आलेले अनुभव यांचा विचार करूनच नवीन आंतरराष्ट्रीय संघटनेची अर्थात् संयुक्त राष्ट्राची रचना, उद्दिष्टे आणि कार्ये निर्धारित करावीत हा विचारप्रवाह बड्या राष्ट्रांनी मान्य केला. संयुक्त राष्ट्राच्या कल्पनेचे बीजारोपण हे सन १९४१ च्या अटलांटिक सनदेत झाले. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट आणि ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांच्या दरम्यान उत्तर अटलांटिक समुद्रात एका युद्धनौकेत एक बैठक झाली. या बैठकीत युद्ध रणनीतीबरोबरच युद्धोत्तर विश्वरचनेत आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्थेसाठी काय उपाययोजना असायला हवी यावर चर्चा झाली. युद्धोत्तर सामान्य सुरक्षाव्यवस्था (Postwar General Security System) कशा स्वरूपाची असावी हा बैठकीचा मुख्य विषय होता. या बैठकीत झालेल्या चर्चेच्या आधारावर एक आठ कलमी सनद बनविण्यात आली. जी अटलांटिक सनद (Atlantic Charter of 1941) या नावाने ओळखली जाते. या कलमांमधून युद्धोत्तर विश्वरचनेत आंतरराष्ट्रीय संघटनेची अपरिहार्यता व्यक्त केली गेली होती. संयुक्त राष्ट्राच्या निर्मितीच्या दिशेने टाकण्यात आलेले हे पहिले पाऊल होते. अशाच स्वरूपाचा विचारविनिमय अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्सच्या नेत्यांमध्ये सन १९४३ साली झालेल्या कासाब्लांका परिषदेत झाला. कासाब्लांका परिषदेचा विशेष म्हणजे युद्धोत्तर विश्वरचनेत संयुक्त राष्ट्रासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या निर्मितीला फ्रान्सचे मिळालेले समर्थन. याच वर्षी मॉस्को येथे सोव्हिएट रशिया, ब्रिटन, अमेरिका आणि चीनच्या प्रतिनिधींची एक बैठक झाली. या बैठकीत दोस्त राष्ट्रांच्या

युद्धरणनीतीबरोबरच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वावर एखादी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन केली जावी या कल्पनेवर सहमती झाली. चीनचे प्राप्त झालेले समर्थन हा मॉस्को परिषदेचा विशेष होता.

संयुक्त राष्ट्राच्या कल्पनेला स्पष्ट रूप डंबस्टोन ओकस प्रस्तावातून प्राप्त झाले. नवीन प्रस्तावित संघटनेचे स्वरूप कसे असावे, या संघटनेच्या घटनेत कोणत्या तरतुदींचा समावेश असावा याविषयी सविस्तर चर्चा वॉशिंग्टन येथे २१ ऑगस्ट ते ७ ऑक्टोबर १९४४ यादरम्यान पार पडली. ही चर्चा दोन टप्प्यांमध्ये पार पडली आणि त्यामध्ये ब्रिटन, सोव्हिएट रशिया, अमेरिका आणि चीनच्या प्रतिनिधींनी भाग घेतला, या चर्चेअंती जो प्रस्ताव तयार करण्यात आला तो डंबस्टोन ओकस प्रस्ताव म्हणून ओळखला जातो. या प्रस्तावामध्ये ज्या तरतुदींचा समावेश होता त्यांना पुढे संयुक्त राष्ट्राच्या घटनेत समाविष्ट करण्यात आले.

फेब्रुवारी १९४५ मध्ये याल्टा येथे अमेरिका, ब्रिटन आणि सोव्हिएट रशियाच्या प्रतिनिधींची एक बैठक झाली. या बैठकीतील चर्चेचा मुख्यत: विषय होता सुरक्षा परिषदेचे स्वरूप आणि या परिषदेमध्ये होणारे मतदान, ठराव किंवा प्रस्ताव मंजूर करण्याची प्रक्रिया. हा विषय वॉशिंग्टन येथे झालेल्या बैठकीतही चर्चिला गेला; पण अमेरिका आणि सोव्हिएट रशियाचे एकमत होऊ शकले नाही. परिणामी या विषयाचा समावेश डंबस्टोन प्रस्तावात करण्यात आला नव्हता. याल्टा परिषदेत मात्र या विषयावर सविस्तर चर्चा होऊन सुरक्षा परिषदेमध्ये मतदानाच्या प्रक्रियेवर अमेरिका आणि सोव्हिएट रशियामध्ये सहमती झाली. सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यांना नकाराधिकार (Veto Power) देण्याची कल्पना याच परिषदेत विकसित झाली. नकाराधिकाराच्या या विशेषाधिकाराचा समावेश पुढे संयुक्त राष्ट्राच्या घटनेत करण्यात आला.

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या दिशेने अंतिम पाऊल पडले ते सॅन फ्रान्सिस्को परिषदेच्या रूपाने. सॅन फ्रान्सिस्को परिषदेचा निर्णय हा याल्टा परिषदेत झाला होता. यूएनच्या स्वरूपाला आणि सनदेला अंतिम रूप देण्यासाठी सर्व राष्ट्रांची एक जागतिक परिषद बोलावली जावी असे याल्टा परिषदेत ठरविण्यात आले. त्यानुसार २५ एप्रिल ते २६ जून १९४५ या दरम्यान सॅन फ्रान्सिस्को येथे ही परिषद भरविण्यात आली. या परिषदेला ५० राष्ट्रांचे २८२ प्रतिनिधी उपस्थित होते. दोन महिने चाललेल्या या परिषदेत यूएनच्या सनदेला अंतिम रूप देण्याचा प्रयत्न झाला. या कार्यासाठी अनेक समित्या आणि आयोग निर्माण करण्यात आले होते. याच



परिषदेत सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्य राष्ट्रांच्या नावांवर शिक्कामोर्तब झाले. चीन, फ्रान्स, अमेरिका आणि सोव्हिएट रशिया आणि ब्रिटन या सुरक्षा परिषदेच्या पाच कायम सदस्य राष्ट्रांनी २४ ऑक्टोबर १९४५ ला यूएनच्या सनदेवर स्वाक्षऱ्या करून त्याला मान्यता दिली. २४ ऑक्टोबर १९४५ ला संयुक्त राष्ट्रे औपचारिकदृष्ट्या अस्तित्वात आली. २४ ऑक्टोबर हा यूएनदिवस म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो.

**संयुक्त राष्ट्राचे मुख्य घटक**

↓

आमसभा | सुरक्षा परिषद | आर्थिक आणि सामाजिक समिती | सचिवालय | आंतरराष्ट्रीय न्यायालय

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी मुख्य घटक सहा होते. सहावा घटक हा विश्वस्त समिती होता. ही समिती ज्या कार्याच्या पूर्ततेसाठी तयार करण्यात आली होती ते पूर्ण झाल्याने १९९४ साली या समितीचे कार्य निलंबित करण्यात आले.

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या दिशेने सन १९४१ पासून ज्या हालचाली झाल्या त्यांची दोन वैशिष्ट्ये स्पष्टपणे जाणवतात.

(१) सन १९४१ च्या अटलांटिक सनदेपासून तर १९४५ च्या याल्टा परिषदेपर्यंत झालेल्या सर्व बैठका आणि परिषदांमध्ये ''युद्धोत्तर विश्वरचनेत आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यावर'' (Maintenance of International Peace and Security) सर्वाधिक भर होता. अशी शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी युद्धोत्तर विश्वरचनेत सामान्य सुरक्षा व्यवस्था (General Security System) कशी विकसित करता येईल हा त्यांच्या चिंतेचा विषय होता.

(२) बहुतेक चर्चा आणि बैठका अमेरिका, ब्रिटन, सोव्हिएट रशिया आणि फ्रान्स या महासत्तांमध्येच झाल्या. शेवटी चीनचा ह्यात समावेश झाला आणि अगदी शेवटच्या टप्प्यात म्हणजे १९४५च्या सॅन फ्रॅन्सिस्को परिषदेच्या वेळी इतर राष्ट्रांना त्यात सहभागी करून घेण्यात आले. परिणामी युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेची जबाबदारी या राष्ट्रांवरच आहे असे चित्र निर्माण झाले. विशेष म्हणजे या राष्ट्रांनी सुरक्षा परिषदेमध्ये आपले स्थान पक्के करून नकाराधिकारासारखा

विशेषाधिकार प्राप्त केला. या राष्ट्रांची संयुक्त राष्ट्रावर मजबूत पकड निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका पोहचविणारे आक्रमक राष्ट्र कोणते हे ठरविण्याचा आणि त्या राष्ट्राविरुद्ध कारवाई करण्याचा अधिकार या राष्ट्रांना सुरक्षा परिषदेच्या माध्यमातून प्राप्त झाला. आजही या राष्ट्रांची संयुक्त राष्ट्रावर मक्तेदारी आहे. ही मक्तेदारी कमी करण्यासाठीच सध्या सुरक्षा परिषदेच्या विस्ताराची मागणी बळावली आहे.

**संयुक्त राष्ट्राची घटना आणि प्रमुख घटक.**

संयुक्त राष्ट्राच्या घटनेत खालील तीन गोष्टींचा समावेश होतो.

(१) घटनेचा सरनामा (Preamble)

(२) एकोणीस प्रकरणे

(३) एकशे अकरा कलमे (www.un.org/aboutun/charter)

यू. एन. च्या घटनेत सुरुवातीलाच यू. एन. च्या स्थापनेमागची प्रमुख उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली आहेत. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा टिकविणे, राष्ट्राराष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे, आंतरराष्ट्रीय संघर्ष शांतता आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडविणे आदी उद्दिष्टांचा समावेश होतो. यू. एन. च्या प्रमुख घटक अंगांमध्ये

(१) आमसभा

(२) सुरक्षा परिषद

(३) आर्थिक आणि सामाजिक परिषद

(४) विश्वस्त परिषद

(५) आंतरराष्ट्रीय न्यायालय

(६) सचिवालय यांचा समावेश होतो.

संयुक्त राष्ट्राच्या परिवारात याशिवाय १५ प्रमुख संस्था, शंभरहून अधिक उपसंस्था, आयोग, समित्या आणि विभागांचा समावेश होतो.

**यूएनची घटनादुरुस्ती**

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेवेळची परिस्थिती आणि आजची परिस्थिती यात मोठे अंतर आहे. बदलत्या परिस्थितीनुसार नवीन आव्हानांचा सामना यूएनला करावा लागत आहे. यूएनचे कार्यक्षेत्र विस्तारले आहे. त्याचबरोबर यूएनकडून आंतरराष्ट्रीय समुदायाच्या अपेक्षापण वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत नवीन आव्हानाचा सामना करण्यासाठी, वाढलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी यूएनमध्ये काही संरचनात्मक बदल अपेक्षित आहेत. या बदलांसाठी यूएनच्या घटनेत दुरुस्ती करावी लागेल. हे अवघड कार्य आहे. यूएनची घटना परिदृढ आहे. घटनादुरुस्तीची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. संयुक्त राष्ट्राच्या घटनादुरुस्तीची प्रक्रिया घटनेतील कलम १०८ मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार

Amendment to the present charter shall come into force for all members of the United Nations when they have been adopted by a vote of two thirds of the members of the General Assembly and ratified in accordance with their respective constitutional processes by two thirds of the members of the United Nations, including all permanent members of the security council.

या तरतुदीवरून संयुक्त राष्ट्राच्या घटनेची परिदृढता स्पष्ट होते.

परिणामी आतापर्यंत केवळ तीन वेळा घटनादुरुस्ती करण्यात आली. (अ) सुरक्षा परिषदेची सदस्यसंख्या ११ वरून १५ वर करण्यासाठी, (ब) आर्थिक आणि सामाजिक परिषदेची सदस्यसंख्या मूळ १८ वरून ४५ करण्यासाठी, (क) आर्थिक आणि सामाजिक परिषदेची सदस्यसंख्या ४५ वरून ५४ करण्यासाठी.

## (क) यू. एन. ची उद्दिष्टे

संयुक्त राष्ट्राची स्थापना काही विशिष्ट उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी झाली होती. या संघटनेची स्थापना दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर झाली असल्याने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवून तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून आंतरराष्ट्रीय समुदायाला वाचविणे हे या संघटनेचे पहिले प्रमुख उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी राष्ट्राराष्ट्रांमधील प्रश्न शांतता आणि सहकार्याच्या, चर्चेच्या माध्यमातून सोडविणे आवश्यक आहे. अशा सहकार्यासाठी आणि चर्चेसाठी राष्ट्रांना व्यासपीठ पुरविणे हे यू.एन.च्या स्थापनेमागचे दुसरे प्रमुख उद्दिष्ट आहे. सबळ आणि सक्षम आंतरराष्ट्रीय संघटनेच्या अभावामुळेच पहिले आणि दुसरे महायुद्ध घडून आले. परिणामी संयुक्त राष्ट्राच्या माध्यमातून ही उणीव भरून काढण्याचे ठरविण्यात आले होते. ब्रूस रसेट यांनी आपल्या वर्ल्ड पॉलिटिक्स या ग्रंथात आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या उद्दिष्टासाठी

वास्तववादाला कशी मुरड घालण्यात आली याविषयी मत नोंदवले आहे- Since the international system lacked a central authority, one strategy for promoting international cooperation was the creatinon of an IGO that all states, or almost all states, would be willing to join. Thus, their realism was tempered by enough idealist vision to seek new international institution and procedures to promote common interests (ब्रूस रसेट, २००४:२९९-३००)[२]

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी राष्ट्रांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा आहे. शांतता आणि विकास या दोन्ही संकल्पना परस्परपूरक आहेत. शांततेशिवाय विकास अवघड आहे आणि विकासासाठी शांतता ही पूर्वअट आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्वच राष्ट्रांचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आदि क्षेत्रांतील विकास साधून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे हे संयुक्त राष्ट्राचे तिसरे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विकासासाठी राष्ट्राराष्ट्रांमधील सहकार्य आवश्यक आहे. हे सहकार्य साधण्याचे कार्य यू. एन. च्या माध्यमातून होते. राष्ट्राराष्ट्रांमधील परस्पर संबंधाचे संसूचन करून सहकार्य साधणे हे यू.एन. चे तिसरे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विलियम गेनॉटन या अभ्यासकांच्या मते "A careful look at the mandate reveals that it is about much more than peace and security... the mandate is primarily about cooperation, preventation, diplomatic interference (विलियम गेनॉटन हर्वड इंटरनॅशनल रिव्ह्यू २००७)[३]

आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये सर्वच राष्ट्रांचे सामर्थ्य एकसमान नाही. सत्तेची विभागणी राष्ट्रांमध्ये असमान झाल्याचे दिसते. परिणामी काही राष्ट्रे सामर्थ्यवान आहेत तर काही राष्ट्रे दुर्बल. दुर्बल राष्ट्रांना सबळ राष्ट्रांकडून आक्रमणाचा अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होण्याचा किंवा दबाव टाकण्याचा सातत्याने धोका असतो. मोठ्या राष्ट्रांपासून आपल्या स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे रक्षण कसे करता येईल, ही छोट्या राष्ट्रांची प्रमुख चिंता असते. छोट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे यू.एन.च्या स्थापनेमागचे चौथे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. यू. एन. आपल्या सर्व सदस्य राष्ट्रांना सार्वभौम समानतेची हमी देते. यू. एन. ची स्थापना ही सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वांतर्गत झाली आहे. या तत्त्वानुसार यू. एन. च्या कोणत्याही सदस्य राष्ट्रावरील आक्रमण हे सर्व सदस्य राष्ट्रांवरील आक्रमण म्हणून गृहीत धरले जाते. एखाद्या छोट्या राष्ट्रावर शेजारच्या मोठ्या राष्ट्राकडून



आक्रमण किंवा हस्तक्षेपाच्या रूपाने अन्याय झाला असेल; तर यू. एन. त्या राष्ट्राच्या मदतीला धावून जाईल. दुर्दैवाने यू. एन. ला आपल्या स्थापनेपासूनच शीतयुद्धाचे ग्रहण लागल्यामुळे सामूहिक सुरक्षिततेचे हे तत्त्व क्वचितच अंमलात येऊ शकले. १९५० साली द. कोरियाच्या रक्षणासाठी आणि १९९०-९१ साली कुवेतच्या रक्षणासाठी यू. एन. ने या हत्याराचा वापर केला.

यू. एन. च्या स्थापनेमागचे पाचवे उद्दिष्ट हे आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव अधिकारांचा प्रसार आणि संरक्षणाचे आहे. यू. एन. आपल्या स्थापनेपासूनच मानव अधिकारांच्या प्रश्नाविषयी संवेदनशील आहे. मानव अधिकारांच्या रक्षणासाठी यू. एन. मार्फत आंतरराष्ट्रीय मानव अधिकार कायद्याचे विस्तृत जाळे विणण्यात आलेले आहे. मानव अधिकारांच्या रक्षणासाठी सर्व सदस्य राष्ट्रांच्या व्यवहारात आणि कृत्यात सुसंगतता आणणे यासाठी यू. एन. सक्रिय आहे.

यू. एन. ची प्रमुख उद्दिष्टे थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे.


२. सर्व राष्ट्रांमधील शांतता, सहकार्य आणि मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करणे.

३. राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्ष, प्रश्न, वाद सहकार्य आणि चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करणे.

४. सर्व सदस्य राष्ट्रांचा सहकार्याच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधणे.

५. मानव अधिकारांचे संरक्षण करणे या अधिकारांचा प्रसार करण्याबरोबरच या अधिकारांविषयी आंतरराष्ट्रीय जनमत संवेदनशील बनविणे.

६. सर्व सदस्य राष्ट्रांच्या विशेषत: दुर्बल राष्ट्रांच्या स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे.




## (ड) संयुक्त राष्ट्रे : प्रमुख वैशिष्ट्ये

### (१) बहुपक्षीयता (Multilateralism)

बहुपक्षीयता हा संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेचा एक मूलभूत आधार आहे. आजच्या युगात बहुपक्षीयता एक पर्याय नसून अपरिहार्यता बनली आहे. मानवी

### संयुक्त राष्ट्राचा अर्थसंकल्प : घटनात्मक तरतुदी

संयुक्त राष्ट्राजवळ स्वत:ची अशी उत्पन्नाची साधने नाहीत. या संघटनेच्या खर्च सदस्य राष्ट्रांनी दिलेल्या आर्थिक मदतीवर भागवला जातो. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेकडून अर्थसंकल्पाला मंजुरी दिली जाते. कोणत्या सदस्याकडून किती आर्थिक मदत घ्यायची हे ठरविण्याचा अधिकार आमसभेला आहे. यूएनच्या सध्याचा अर्थसंकल्प हा चार अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक आहे. त्यापैकी बहुसंख्य पैसा हा शांतिसैनिक मोहिमांवर खर्च केला जातो. सन २००५-०६ चा शांतिसैनिक मोहिमांचा अर्थसंकल्प हा पाच अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा होता. सध्या संयुक्त राष्ट्राकडून जगभरात १७ शांतिसैनिक मोहिमा राबवल्या जात असून त्यात ७०,००० हून अधिक सैनिक सहभागी झाले आहेत. संयुक्त राष्ट्राला सर्वात जास्त आर्थिक मदत अमेरिकेकडून होते. संयुक्त राष्ट्राच्या एकूण खर्चापैकी २२% खर्च हा एकट्या अमेरिकेकडून मिळालेल्या निधीवर भागवला जातो. आर्थिक मदतीच्या बाबतीत अमेरिका पाठोपाठ, जपान, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, इटली आणि कॅनडा या राष्ट्रांचा क्रमांक लागतो. शांतिसैनिक मोहिमांसाठी सर्वात अधिक मदत अमेरिका, जपान, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, इटली या राष्ट्रांकडून होते.

## (इ) संयुक्त राष्ट्रे : थोडक्यात महत्त्वपूर्ण माहिती

- २४ ऑक्टोबर १९४५ ला संयुक्त राष्ट्रे अस्तित्वात आली. सॅन फ्रॅन्सिस्को इथे भरलेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेत या संघटनेच्या स्थापनेवर शिक्कामोर्तब करण्यात आले. २४ ऑक्टोबर हा संयुक्त राष्ट्राचा स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो.
- संयुक्त राष्ट्राच्या घटनेत एकूण १११ कलमे आणि १९ प्रकरणे असून संयुक्त राष्ट्राची रचना आणि कार्ये, अधिकार तसेच सदस्य राष्ट्रांचे अधिकार आणि त्यांच्या व्यवहारावरील बंधने आदिविषयक तरतुदी आहेत.
- आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे, राष्ट्रांमधील प्रश्न चर्चेच्या माध्यमातून सोडविणे, राष्ट्रांमधील सहकार्यातून विकास साधणे, मानव अधिकारांचे संरक्षण आदी संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेमागची प्रमुख उद्दिष्टे आहेत.
- संयुक्त राष्ट्राचे सहा प्रमुख घटक आहेत यामध्ये आमसभा, सुरक्षा परिषद, आर्थिक आणि सामाजिक परिषद, विश्वस्त समिती, आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि सचिवालयाचा समावेश होतो.
- सदस्य राष्ट्रांकडून मिळणाऱ्या निधीवर संयुक्त राष्ट्राचा खर्च भागवला जातो.

संयुक्त राष्ट्राची आमसभा कोणत्या सदस्याकडून किती निधी घ्यायचा हे ठरविते. संयुक्त राष्ट्राचा वार्षिक अर्थसंकल्प (Budget) चार अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा आहे.

• संयुक्त राष्ट्राच्या कुटुंबात सहा प्रमुख घटकांशिवाय १५ मुख्य संस्था, त्यांच्यामार्फत चालविले जाणारे विविध कार्यक्रम, या संस्थाच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या इतर समित्या-उपसमित्या, आयोग आदींचा समावेश होतो.

• स्थापनेच्यावेळी संयुक्त राष्ट्राची सदस्यसंख्या ५० एवढी होती. ती आता वाढून १९२ एवढी झाली आहे. १९७१ साली सध्याच्या साम्यवादी पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाला संयुक्त राष्ट्राचे आणि त्याचबरोबर सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व बहाल करण्यात आले. साम्यवादी चीनने पूर्वीच्या डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ चायना (तैवान) ची जागा घेतली.

• संयुक्त राष्ट्राचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे आहे. संयुक्त राष्ट्राच्या इतर संस्थांची मुख्यालये रोम, हेग, अदिसअबाबा, मॉंटेरिअल, कोपेनहेगन, बॉन आदी शहरांमध्ये आहेत.

• सध्या संयुक्त राष्ट्राची सदस्यसंख्या १९३ एवढी आहे.

• संयुक्त राष्ट्राचा प्रत्येक सदस्य हा आमसभेचा सदस्य असतो.

• संयुक्त राष्ट्राची घटना मान्य असणाऱ्या कोणत्याही शांतताप्रिय राष्ट्राला संयुक्त राष्ट्राचा सदस्य बनता येते.

• संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी यूएनच्या घटनेतील प्रकरण दोनमधील कलम चार अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे.

• सदस्यत्वासाठी सुरक्षा परिषदेची शिफारस आणि आमसभेची मान्यता ओळखली जातात.

• संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व केवळ राज्यानाच बहाल केले जाते. राज्यकाना (Non State Actors) नाही. राज्यके निरीक्षक या नात्याने आमसभेच्या बैठकांमध्ये सहभागी होऊ शकतात.

• सदस्य राष्ट्रांशिवाय एका सार्वभौमराज्याला, होलीसी (Holysee) ला कायम निरीक्षकाचा दर्जा १९६४ पासून देण्यात आला आहे. हा दर्जा Non Member Observer State या नावाने ओळखला जातो.

• १९९१ ते २००८ या काळात ३३ नवीन राष्ट्रांना संयुक्त राष्ट्राने सदस्यत्व बहाल करण्यात आले आहे. २००६ साली कॉन्टेनेग्रो या राष्ट्राला १९२ वे सदस्य राष्ट्र म्हणून सामावून घेण्यात आले.

## (१) आमसभा : संरचना, स्वरूप आणि कार्य

संयुक्त राष्ट्राच्या सर्व सदस्य राष्ट्रांना प्रतिनिधित्व असणारे एकमेव घटक अंग म्हणजे आमसभा. यूएनचे विचारविर्मश मंडळ (Deliberative Body) म्हणून आमसभा ओळखली जाते. विचारविमर्श करून शिफारस करणे आमसभेचे कार्य आहे, (to consider, discuss and make recommendations). सर्व सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधित्व असल्यामुळे हा सर्वात मोठा घटक म्हणून ओळखला जातो. आमसभेचा उल्लेख "Town meeting of the whole world" असा केला जातो. प्रत्येक सदस्य राष्ट्राला आंतरराष्ट्रीय समुदायापुढे आपले मत, विचार आणि तक्रारी मांडण्याचे आमसभा एक उत्कृष्ट व्यासपीठ आहे. राष्ट्राराष्ट्रांमधील वाद, समस्यांवर येथे चर्चा होते. त्याचप्रमाणे सर्व सदस्य राष्ट्रांच्या सामूहिक हितसंबंधाशी संबंधित प्रश्न जसे- पर्यावरणाचे संरक्षण, मानवाधिकार, अण्वस्त्रांचा प्रसार, दहशतवाद आदी प्रश्नांवर आमसभेत खुली चर्चा होते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेचा प्रश्न सोडल्यास इतर सर्व बाबतीत धोरण ठरविण्याचा अधिकारही आमसभेला आहे. म्हणूनच आमसभेला संयुक्त राष्ट्राचे कायदेमंडळ म्हणूनदेखील संबोधले जाते. संयुक्त राष्ट्राच्या सर्व कार्यांचे केंद्र आमसभा आहे.

संयुक्त राष्ट्राच्या घटनेतील चौथ्या प्रकरणामध्ये आमसभेचे स्वरूप आणि रचनेविषयीचे विवेचन देण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक सदस्य राष्ट्राला एक मत देण्यात आले आहे आणि पाच प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे. आमसभेतील प्रत्येक निर्णय अथवा ठराव मतदानाच्या आधारे मंजूर केला जातो. आमसभेची वर्षातून एकदा सप्टेंबर महिन्यात नियमितपणे बैठक होते. ही बैठक आमसभेचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे होते. या बैठकीला सर्व सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित राहतात. राष्ट्रांचे नेते अथवा परराष्ट्रमंत्री एकापाठोपाठ एक आमसभेला संबोधित करतात. आमसभेच्या वार्षिक बैठकीशिवाय विशेष बैठक बोलविण्याचा अधिकार यूएनच्या महासचिवांना आहे. महासचिव सुरक्षा परिषदेच्या शिफारशीवरून विशेष बैठक आमंत्रित करतात. आमसभेची विशेष बैठक सर्व सदस्य राष्ट्रांच्या सामूहिक हिताशी निगडित विषयांसंबंधी विचारविमर्श करण्यासाठी बोलावली जाते. जसे आर्थिक सहकार्याचा प्रश्न, मानव अधिकारांच्या रक्षणाचा प्रश्न, नि:शस्त्रीकरणाचा प्रश्न. सन १९८२ साली नि:शस्त्रीकरणाच्या प्रश्नावर आमसभेची विशेष बैठक बोलाविण्यात आली होती.

वार्षिक बैठकीदरम्यान अध्यक्षाची निवड केली जाते. अध्यक्षाचा कार्यकाल



एक वर्षाचा असतो. अध्यक्षाची निवड गुप्त मतदान पद्धतीने केली जाते. आमसभेच्या अध्यक्षाला फारसे अधिकार नाहीत. आमसभेचे कामकाज चालविणे, शिस्त राखणे, कामकाजविषयक नियमांचे पालन होते आहे अथवा नाही यावर लक्ष ठेवणे, ही अध्यक्षाची प्रमुख कार्ये आहेत. अध्यक्षांबरोबरच २१ उपाध्यक्षांचीही निवड केली जाते. हे उपाध्यक्ष आमसभेतील वेगवेगळ्या क्षेत्रांचे कामकाज पाहतात. आमसभेची आणीबाणीच्या प्रसंगी बैठक बोलावली जाऊ शकते.

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी ज्या वेळी आमसभेला पुढाकार घ्यावा लागतो; त्या वेळी अशी बैठक बोलावली जाते. यूएनच्या घटनेनुसार ही जबाबदारी सुरक्षा परिषदेची आहे; पण नकाराधिकाराचा गैरवापर आणि कायम सदस्यांमध्ये सहमतीचा अभाव यामुळे जेव्हा सुरक्षा परिषद आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसंबंधी निर्णय घेण्यास असमर्थ ठरते त्या वेळी आमसभेला पुढाकार घ्यावा लागतो. आणीबाणीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी बोलाविण्यात आलेली बैठक चोवीस तासांच्या आत व्हायला हवी असा नियम आहे. आमसभेची आणीबाणी बैठक हा संयुक्त राष्ट्राच्या मूळ घटनेचा भाग नाही. ही पद्धत परंपरेचा भाग असून सन १९५० पासून ही परंपरा सुरू झाली. ही परंपरा सुरू होण्यामागे शीतयुद्धाच्या राजकारणाची पार्श्वभूमी होती. शीतयुद्धाच्या राजकारणामुळे अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यात आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या अनेक प्रश्नांवर सहमती होणे अवघड बनले होते. या राष्ट्रांकडून नकाराधिकाराचा वापर शीतयुद्धाच्या राजकारणातील साधन म्हणून होत होता. परिणामी आमसभेला पुढाकार घ्यावा लागला. आणीबाणीच्या प्रसंगी बोलविण्यात येणारी आमसभेची बैठक ही क्वचितच घडणारी घटना आहे. आतापर्यंत केवळ नऊ वेळा अशी आणीबाणी बैठक बोलविण्यात आली होती.

सन १९५० साली आमसभेने बहुमताने क्रांतिकारी ''शांततेसाठी संघटित होण्याचा ठराव'' मंजूर केला. या ठरावाने आमसभेला सामूहिक सुरक्षिततेद्वारे शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त करून दिला. संयुक्त राष्ट्राच्या घटनेनुसार शांतता आणि सुरक्षितता टिकविणे, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोक्यात आणणाऱ्या राष्ट्राविरुद्ध कारवाई करण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला आहे. तथापि या अधिकाराचा वापर सुरक्षा परिषदेला शीतयुद्धाच्या राजकारणामुळे यशस्वीपणे करता येत नव्हता. शीतयुद्धकालीन हितसंबंधांना गृहीत धरून सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांकडून नकाराधिकाराचा वापर होत असल्यामुळे संघर्षमय परिस्थितीवर तोडगा

काढणे सुरक्षा परिषदेसाठी अवघड बनले होते. आमसभेने मंजूर केलेल्या ठरावानुसार जर सुरक्षा परिषद शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याच्या कार्यात अयशस्वी ठरली तर आमसभेला कारवाईचे अधिकार असतील असे स्पष्ट करण्यात आले. (थॉमस विझ, फोर्सिथ, १९९७ : ३०)[१]

आमसभेकडून मंजूर झालेला हा ठराव श्रीमंत पाश्चिमात्य राष्ट्रे विरुद्ध तिसऱ्या जगातील अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील संघर्ष दर्शवितो. संयुक्त राष्ट्रावर विशेषतः सुरक्षा परिषदेवर पाश्चिमात्य राष्ट्रांची मक्तेदारी आणि शीतयुद्धाच्या राजकरणात राजकीय आणि सामाजिक हितसंबंधांच्या रक्षणासाठी महासत्तांकडून केला जाणारा सुरक्षा परिषदेचा वापर तिसऱ्या जगातील गरीब राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या उद्दिष्टांविरोधी जाणारा होता. आमसभेत बहुमत तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे होते. आपल्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी तसेच निर्वसाहतीकरणाचे व्यापक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी यूएनच्या व्यासपीठाचा वापर या राष्ट्रांना करून घ्यायचा होता. यूएनच्या व्यासपीठाचा शीतयुद्धाच्या राजकारणासाठी वापर करण्याची अमेरिका आणि सोव्हिएट रशियाची योजना या राष्ट्रांनी धुडकावून लावली.

**आमसभा : महत्त्वाची वैशिष्टे**

- आमसभा हे वैश्विक स्तरावरील वाटाघाटींसाठी, विचारविनिमय आणि सल्लामसलतीसाठी असलेले मध्यवर्ती व्यासपीठ आहे.
- आमसभेचे ठराव हे शिफारशींच्या स्वरूपातील असतात. ते सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक नसतात.
- गेल्या साठ वर्षांतील आमसभेचे सर्वात महत्त्वाचे कार्य हे निर्वसाहतीकरणाच्या क्षेत्रातील आहे. तिसऱ्या जगातील ऐंशी राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त करून देण्यासाठी आमसभेने प्रयत्न केले. संयुक्त राष्ट्र संघाचा अर्थसंकल्प तयार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही आमसभेकडून पार पाडले जाते.
- आंतरराष्ट्रीय समुदायाशी संबंधित जागतिक स्वरूपाच्या प्रश्नांवर चर्चा घडवून सहमती निर्माण करण्याची (Consensus Building) भूमिका आमसभा पार पाडते.
- आमसभेने केलेले ठराव हे जरी यूएनच्या सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक नसले तरीदेखील या ठरावांनी अनेक आंतरराष्ट्रीय करारांचा पाया घातला आहे. जे त्या कराराच्या पक्षकार राष्ट्रांवर बंधनकारक आहेत.



आमसभेत सर्व निर्णय आणि ठराव बहुमताने मंजूर केले जातात. सन १९८० च्या दशकापासून यूएनच्या सदस्य राष्ट्रांमध्ये सर्वसामान्य मताने (Consensus Vote) ठराव मंजूर करण्याचा प्रवाह विकसित झालेला असतो. सन १९८० आणि सन १९९० च्या दशकात आमसभेकडून मंजूर झालेले बहुतांश ठराव हे सर्वसामान्य मताने मंजूर झाले होते. सहकार्य आणि तडजोडीविषयीची राष्ट्रांची इच्छाशक्ती सर्वसामान्य मताच्या पाठीशी आहे. ठरावातील एखाद्या तरतुदीविषयी राष्ट्रांमध्ये मतभेद असले तरी असे मतभेद त्यांनी ठराव मंजुरीच्या आड येऊ दिलेले नाहीत (केगली आणि विटकॉफ, १९९३ : १६३)[२]

जे ठराव आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेशी संबंधित असतात, ते मंजूर होण्यासाठी २/३ बहुमताची गरज असते. आमसभेच्या वार्षिक बैठकीदरम्यान जे विषय चर्चिले जातात, त्यांची यादी संयुक्त राष्ट्राच्या महासचिवांकडून केली जाते. सुरक्षा परिषदेकडून आमसभेला जो वार्षिक अहवाल सादर केला जातो; त्यावरही चर्चा वार्षिक बैठकीदरम्यान केली जाते.

**आमसभेच्या समित्या :-** आमसभेत समित्या किती असाव्यात यावर यूएनच्या घटनेचे बंधन नाही. आमसभा आपले कामकाज सहा प्रमुख समित्यांमार्फत पार पाडते. त्यात काही कार्यकारी स्थायी समित्या तर काही विषय समित्या आहेत. महत्त्वाच्या समित्यांमध्ये शस्त्रास्त्रांच्या प्रसाराच्या प्रश्नशी निगडित राजकीय आणि संरक्षण समिती (Political and Security Committee), आर्थिक समस्यांवर कार्य करणारी आर्थिक आणि वित्तीय समिती (Economic and financial Committee), सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांविषयी कार्य करणारी सामाजिक, मानवतावादी आणि सांस्कृतिक समिती (Social, Humanitarian and Cultural Committee), संयुक्त राष्ट्राच्या प्रशासन आणि जमा-खर्चासंदर्भात कार्य करणारी प्रशासकीय आणि अर्थसंकल्प समिती (Administrative and Budgeting Committee) सारख्या समित्या आहेत. वरील विषयांसंबंधी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी प्रथम तो विषयाशी संबंधित समितीकडे पाठविला जातो. समितीमध्ये त्या विषयावर सर्वंकष चर्चा होऊन अहवाल तयार केला जातो. समितीने तयार केलेल्या अहवालाच्या आणि शिफारशींच्या आधारावर आमसभा निर्णय घेते. आमसभेकडून सदस्य राष्ट्रांच्या विकासासाठी जे विविध कार्यक्रम राबविले जातात त्या कार्यक्रमांचे समन्वयन या समित्यांकडून होते. या कार्यात सर्वांत महत्वाचे योगदान आर्थिक आणि सामाजिक समितीचे (Economic and Social Coun-

cil) आहे. आमसभेच्या कार्यकारी समित्या निर्वसाहतीकरण, नि:शस्त्रीकरण यासारख्या क्षेत्रांमध्ये सक्रिय होत्या. सध्या आंतरराष्ट्रीय कायद्याशी निगडित काही विषयांवर कार्यकारी समित्या नेमण्यात आल्या आहेत. आमसभेच्या दोन स्थायी समित्या आहेत (अ) प्रशासकीय आणि अर्थसंकल्प सल्लागार समिती. या समितीमध्ये एकूण सोळा सदस्य आहेत. (ब) आर्थिक योगदानविषयक समिती (Committee on Contributions) या समितीत एकूण १८ सदस्य आहेत. या सर्व समित्यांचे अध्यक्ष दरवर्षी आमसभेच्या सप्टेंबर महिन्यातील वार्षिक बैठकीदरम्यान निवडले जातात. याशिवाय आमसभेकडून वेळोवेळी आवश्यकतेनुसार काही हंगामी समित्यांची स्थापना केली जाते.

**आमसभेच्या समित्या**

आमसभेच्या सहा प्रमुख समित्या आहेत. त्या विविध क्षेत्रांत सक्रिय आहेत.

१) राजकीय आणि सुरक्षासंबंधी प्रश्नांविषयीची समिती
२) आर्थिक आणि वित्तीय प्रश्नासंबंधीची समिती
३) सामाजिक, मानवतावादी आणि सांस्कृतिक प्रश्नांसंबंधीची समिती
४) विश्वस्त राष्ट्रांसंबंधीची समिती
५) प्रशासकीय आणि अर्थसंकल्पविषयीची समिती
६) कायदेशीर प्रश्नांसंबंधीची समिती

या समित्यांअंतर्गत अनेक उपसमित्या नेमण्यात आलेल्या आहेत. या समित्यांमधून नि:शस्त्रीकरणापासून ते आंतरराष्ट्रीय कायद्यापर्यंतच्या विविध प्रश्नांवर विचारविनिमय होऊन शिफारशी केल्या जातात.

## आमसभेचे अधिकार व कार्ये

**१) विचारविमर्श आणि शिफारशी :-** आमसभा ही संयुक्त राष्ट्रांची विचारविमर्श, चर्चा आणि शिफारशी करणारी शाखा आहे. विचारविमर्श करून शिफारशी करणे आमसभेचे प्रमुख कार्य आहे. यूएनच्या घटनेतील कोणत्याही तरतुदीविषयी खुली चर्चा या व्यासपीठावर होते. या व्यासपीठावरून राष्ट्रे आपले विचार, युक्तिवाद, प्रश्न आणि तक्रारी मांडतात, त्यावर चर्चा होते. सुरक्षा समिती जे वार्षिक अहवाल आमसभेला सादर करते; त्यावरही आमसभेत चर्चा होते. याशिवाय यूएनच्या आधिपत्याखाली कार्य करणाऱ्या विविध संस्था, संघटनांच्या अहवालावर आमसभेत चर्चा होते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या प्रश्नापासून तर गरीब, अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाशी निगडित विषयांपर्यंत सर्व प्रकारच्या प्रश्नांवर, समस्यांवर आमसभेत विचारविमर्श होतो आणि त्या आधारावर शिफारशी केल्या जातात. यूएनच्या सर्व सदस्य राष्ट्रांच्या सामूहिक हिताशी निगडित विषय जसे पर्यावरणाच्या रक्षणाचा प्रश्न, मानव अधिकार, अण्वस्त्रांचा प्रसार, दहशतवाद, वंशवाद, निर्वसाहतीकरण यांसारख्या मुद्यांवर चर्चा, विचारविमर्श होऊन ठराव मंजूर केले जातात. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे ही जरी सुरक्षा परिषदेची प्राथमिक जबाबदारी असली तरी अनेकदा सुरक्षा परिषदेतील सहमतीच्या अभावाप्रसंगी आमसभा पुढाकार घेते. आमसभेची आणीबाणी बैठक बोलाविली जाते. अशा मुद्यावर २/३ बहुमताने ठराव मंजूर केले जातात.

आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्याच्या दिशेने शिफारशी करण्याचा अधिकार आमसभेला आहे. त्याचप्रमाणे शस्त्रास्त्रस्पर्धा नियंत्रित करण्यासंदर्भात शिफारशी करण्याचा, नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेशी निगडित नियम बनविण्याचा अधिकार आमसभेला आहे. यूएनच्या घटनेतील कलम १४ अंतर्गत आमसभेला ''राष्ट्राराष्ट्रांमधील संबंध खराब करणाऱ्या आणि सामूहिक कल्याणाला धोका पोहचविणाऱ्या परिस्थितीवर शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्याचा अधिकार आहे.''

**२) आर्थिक अधिकार :-** संयुक्त राष्ट्राच्या अर्थसंकल्पावर आमसभेचे नियंत्रण असते. अर्थसंकल्पाला मंजुरी देण्याचे कार्य आमसभा करते. प्रतिवर्षी कोणत्या क्षेत्रावर किती खर्च करायचा, निधीचे वाटप याविषयी आमसभेत चर्चा होते आणि निर्णय घेतले जातात. यूएनच्या अर्थसंकल्पावर नियंत्रण ठेवून जमा-खर्चाचा लेखाजोखा ठेवण्यासाठी आमसभेने एक स्वतंत्र समिती बनविली आहे. अर्थसंकल्पाच्या बाबतीत या समितीच्या शिफारशी महत्त्वाच्या मानल्या जातात. संयुक्त राष्ट्राचा खर्च हा सदस्य राष्ट्रांनी दिलेल्या निधीवर चालतो. कोणत्या सदस्य राष्ट्राकडून किती निधी घ्यावा हे ठरविण्याचा अधिकार आमसभेला आहे. यूएनकडून चालविल्या जाणाऱ्या विकासकार्यावर होणारा खर्च, शांती मोहिमांवर होणारा खर्च यावर आमसभेचे नियंत्रण असते.

**३) निर्वाचन अधिकार :-** यूएनच्या महत्त्वपूर्ण शाखा आणि संस्थांमधील प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आमसभेला आहे.

(अ) सुरक्षा परिषदेतील दहा हंगामी अथवा अस्थायी सदस्यांची निवड

आमसभेमार्फत होते.

(ब) आर्थिक आणि सामाजिक समितीतील सदस्य आमसभेकडून निवडले जातात.

(क) आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड आमसभेकडून होते.

(ड) सुरक्षा परिषदेच्या शिफारशीनुसार आमसभा यूएनच्या महासचिवाची नेमणूक करते.

**४) पर्यवेक्षी कार्य :-** आमसभेच्या पर्यवेक्षी कार्याचा उल्लेख यूएनच्या घटनेत करण्यात आला आहे. त्यानुसार यूएनच्या आधिपत्याखाली कार्यरत आसणाऱ्या संस्था, संघटनांकडून अहवाल स्वीकारण्याचा आणि त्यांच्या कार्यावर देखरेख ठेवण्याचा अधिकार आमसभेला आहे. सुरक्षा परिषददेखील आपले वार्षिक अहवाल आमसभेत सादर करते, या अहवालांवर विचारविमर्श करून आमसभा शिफारशी करते. काही संस्थांना आपल्या कार्यासाठी आमसभेची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. जसे आर्थिक आणि सामाजिक परिषद एखादी आंतरराष्ट्रीय परिषद बोलावण्यापूर्वी आमसभेची परवानगी घेते. संयुक्त राष्ट्राच्या विविध शाखांमध्ये प्रशासकीय कार्यासाठी नोकरभरती केली जाते.या नोकरभरतीचे नियम निर्धारित करण्याचे कार्य आमसभेकडून होते. आमसभेचे पर्यवेक्षी कार्यामध्ये समन्वयाचेदेखील कार्य आहे. यूएन अंतर्गत विविध क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या संस्था, संघटनांच्या कार्यांचे समन्वयन आमसभेकडून होते.

**५) घटनादुरुस्तीचा अधिकार :-** संयुक्त राष्ट्राच्या घटनेत दुरुस्तीचा अधिकार हा आमसभेला आहे. घटनादुरुस्तीसाठी आमसभेचे २/३ बहुमत आणि त्यानंतर सुरक्षा परिषदेच्या पाच कायमस्वरूपी सदस्यांची अनुमती (Ratification) या दोन पूर्वअटी आहेत. घटनादुरुस्तीसाठी यूएनच्या सदस्य राष्ट्रांचे विशेष अधिवेशन बोलविले जाऊ शकते. अशा प्रकारचे अधिवेशन बोलाविण्यासाठी देखील आमसभेतील २/३ बहुमत आणि सुरक्षा परिषदेची अनुमती आवश्यक आहे. कोणत्याही घटनादुरुस्तीसाठी यूएनच्या एकूण सदस्यांच्या २/३ बहुमताने घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होणे अवश्यक आहे.

**६) राष्ट्रीय प्रतिनिधीमंडळाला अधिस्वीकृती देण्याचा अधिकार :-** आमसभेला प्राप्त झालेल्या महत्त्वांच्या अधिकारांमध्ये यूएनचे सदस्य म्हणून राष्ट्रीय प्रतिनिधी मंडळाला अधिस्वीकृती देण्याच्या अधिकाराचा समावेश होतो. सन १९७१ साली आमसभेने तैवानमधील राष्ट्रवादी चीनऐवजी साम्यवादी चीनच्या प्रतिनिधी मंडळाला अधिस्वीकृती दिली होती.



आमसभेच्या पुढाकारातून विकसित झालेले महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय ठराव आणि करार

(१) १० डिसेंबर १९४८ ला घोषित करण्यात आलेला मानव अधिकारांचा जाहीरनामा (Universal Declaration of Human Rights)

(२) १९६७ चा बाह्य अंतराळासंबंधीचा करार (Outer Space Treaty)

(३) १९६८ चा अण्वस्त्र प्रसारबंदी करार (Nuclear Nonproliferation Treaty)

(४) १९७१ चा समुद्रतळ शस्त्रास्त्र नियंत्रण करार (Seabed Arms Control Treaty)

## २) सुरक्षा परिषद

सुरक्षा परिषद संयुक्त राष्ट्राचे कार्यकारी मंडळ म्हणून ओळखले जाते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याची आणि अशी शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या राष्ट्राविरुद्ध कारवाई करण्याची मुख्य जबाबदारी सुरक्षा परिषदेवर आहे. आमसभेने घेतलेल्या निर्णयांवर आणि केलेल्या कायद्यांना प्रत्यक्ष रूप देण्याचे कार्य सुरक्षा परिषद करते. सुरक्षा परिषदेने घेतलेले निर्णय यूएनच्या सर्व सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक असतात. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे अथवा नाही, ती कोणाकडून धोक्यात आली झाली आहे, धोक्याचे स्वरूप कसे आहे, धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध कशा स्वरुपाची कारवाई करायला हवी, प्रत्यक्ष लष्करी कारवाई करायची, की आर्थिक, व्यापारी बहिष्कार हे ठरविण्याचे स्वरूपाचे निर्बंध लावायचे याविषयीचे निर्णय घेण्याचे अधिकार सुरक्षा परिषदेला आहेत. एखाद्या राष्ट्रात शांतिसैन्य पाठविण्याचा म्हणजेच एक प्रकारे त्या राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकारही सुरक्षा परिषदेलाच आहे. राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्ष, तह, वादग्रस्त प्रश्नांविषयी सुरक्षा परिषद ठराव पारित करते. गेल्या साठ वर्षांत सुरक्षा परिषदेने १००० हून अधिक ठराव पारित केले आहेत.

### नकाराधिकाराचा वापर

१९४५ ते १९९० च्या शीतयुद्धाच्या काळात नकाराधिकाराचा वापर २३१ वेळा झाला.

त्यापैकी

| | |
|---|---|
| सोव्हिएट रशियाने | ११९ |
| अमेरिकेने | ६९ |
| ब्रिटनने | ३२ |
| फ्रान्सने | १८ |
| चीनने | ०२ |

वेळा नकाराधिकाराचा वापर केला.

केवळ संयुक्त राष्ट्राच्या सदस्यत्वाच्या मुद्यावर ५९ वेळा नकाराधिकार वापरला गेला.

१९९० ते २००७ या काळात केवळ सात वेळा नकाराधिकाराचा वापर झाला.

रशियाने - सायप्रसच्या आणि युगोस्लाव्हियाच्या प्रश्नावर दोनदा

अमेरिकेने - इस्त्रायलच्या प्रश्नावर तीनदा

चीनने - ग्वाहेमाला आणि मॅसेडोनियाच्या प्रश्नावर दोनदा

अशा प्रकारे नकाराधिकाराचा वापर केला.

### सुरक्षा

सुरक्षा परिषदेमध्ये पाच कायमस्वरूपी तर दहा हंगामी असे पंधरा सदस्य आहेत. पाच कायमस्वरूपी सदस्यांमध्ये अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन या राष्ट्रांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्राची जेव्हा स्थापना झाली; तेव्हा तैवानमधील राष्ट्रवादी चीनला सदस्यत्व बहाल करण्यात आले होते. साम्यवादी चीन सन १९७१ पर्यंत यूएनच्या बाहेर होता. सन १९७१ साली साम्यवादी चीनला यूएनचे सदस्यत्व मिळाले आणि त्याच वर्षी सुरक्षा परिषदेतील राष्ट्रवादी चीनची जागा साम्यवादी चीनने घेतली. तैवानला आज केवळ सुरक्षा परिषदेचे नाही तर यूएनचेपण सदस्यत्व नाही. तैवान सदस्यत्वासाठी प्रयत्न करत आहे; पण चीनचा त्याला तीव्र विरोध आहे. सन १९९० साली सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर सुरक्षा परिषदेमधील सोव्हिएट रशियाची जागा आत्ताच्या रशियाने घेतली आहे.



### सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्यत्वाची भौगोलिक विभागणी

| | |
|---|---|
| आशिया/आफ्रिका | ०५ |
| पूर्व युरोप | ०१ |
| लॅटीन अमेरिका | ०२ |
| पश्चिम युरोप आणि इतर | ०२ |

पाच कायमस्वरूपी सदस्यांना नकाराधिकाराचा (Veto Power) विशेषाधिकार देण्यात आला आहे. पाचपैकी एका सदस्याने जरी एखाद्या ठरावावर नकाराधिकार वापरला तरी तो ठराव मंजूर होऊ शकत नाही. असा विशेषाधिकार पाच कायस्वरुपी सदस्य राष्ट्रांना देण्यामागे यूएनच्या निर्मात्यांचा विशिष्ट असा हेतू होता आणि हा हेतू म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी पाचही राष्ट्रांचे एकमत, एकवाक्यता असणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या राष्ट्राविरुद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाअंतर्गत कारवाई करण्यासाठी पाचही कायमस्वरूपी राष्ट्रांची सहमती अपेक्षित आहे. संयुक्त राष्ट्राच्या इतिहासात केवळ एकदा म्हणजे सन १९९०-९१ साली पाचही कायमस्वरूपी सदस्यांची इराकविरुद्ध लष्करी कारवाई करण्यासाठी एकवाक्यता झाली होती. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनिअर) यांच्या मते "For the very first time on a matter of major importance, super power competition was replaced with International Cooperation" (केगली, विटकॉफ, १९९३ : १७६)[३]

स्थापनेपासून तर १९९० पर्यंत म्हणजे शीतयुद्धाच्या शेवटपर्यंत या नकाराधिकाराचा वापर महासत्तांकडून शीतयुद्धातील राजकारणाचे साधन म्हणून झाला. आपले आणि आपल्या गटातील राष्ट्रांचे हितसंबंध जोपासण्यासाठी या अधिकाराचा वापर केला गेला. (जेम्स सुटरलीन, १९९७ : २-५)[४] संयुक्त राष्ट्राच्या निर्मितीनंतर पहिल्या तीन दशकांमध्ये १४४ वेळा नकाराधिकाराचा वापर केला गेला. त्यापैकी ७०% नकाराधिकार हे एकट्या सोव्हिएट रशियाकडून वापरले गेले होते. सन १९४५ ते १९५५ या दहा वर्षांच्या काळात सोव्हिएट रशियाने ७७ वेळा नकाराधिकाराचा वापर केला. अमेरिकेने सन १९७० साली ऱ्होडेशियाच्या प्रश्नावरून नकाराधिकाराचा प्रथम वापर केला. सन १९८० च्या दशकात अमेरिकेने ९८ वेळा नकाराधिकाराचा वापर केला. (केगली, विटकॉफ, १९९३ : १६२)[५] प्रत्येक ठरावाकडे शीतयुद्धाच्या राजकारणाच्या नजरेतून पाहिले गेल्यामुळे तो पारित

होणे अवघड होऊन बसले. सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाअंतर्गत आक्रमक राष्ट्राविरुद्ध कारवाई करण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला आहे. तथापि नकाराधिकाराच्या राजकारणामुळे हे तत्त्व प्रत्यक्षात येऊ शकले नाही. संपूर्ण शीतयुद्धाच्या काळात (१९४५-१९९०) केवळ एकदा म्हणजे १९५० च्या कोरियन युद्धाच्या वेळी सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाची अंमलबजावणी केली गेली आणि उत्तर कोरियाला आक्रमक ठरवून त्याविरुद्ध लष्करी कारवाईचा निर्णय घेतला गेला. हा ठरावदेखील सुरक्षा परिषदेत मतदानाच्या वेळी सोव्हिएट रशिया अनुपस्थित राहिला म्हणून पारित होऊ शकला.

**सुरक्षा परिषदेची कायम सदस्य राष्ट्रे**

अमेरिका, सोव्हिएट रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीनला सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व देण्यामागे दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी जबाबदार आहे. दुसऱ्या महायुद्धात ही पाचही राष्ट्रे दोस्त राष्ट्रे म्हणून ओळखली जात होती. त्यांनी एकत्रित येऊन लोकशाहीच्या रक्षणासाठी हुकूमशाही राष्ट्रांविरुद्ध लढा दिला. लोकशाहीचे रक्षण करून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या रक्षणाचे कार्य या दोस्त राष्ट्रांनी केले. परिणामी भविष्यातदेखील जर अशा स्वरूपाचा धोका आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला निर्माण झाला तर या पाच राष्ट्रांनी आपले सैन्य एकत्र करून संघटितपणे त्याचा सामना करावा अशी अपेक्षा केली गेली. या पाच राष्ट्रांना सुरक्षा परिषदेचे कायम सदस्य बनवले गेले आणि आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या रक्षणाची प्राथमिक जबाबदारी या राष्ट्रांवर सोपविण्यात आली.

साम्यवादी चीनला सन १९७२ साली सुरक्षा परिषदेत प्रवेश मिळाल्यानंतर पहिल्यांदा म्हणजे १९९७ साली चीनने ग्वाटेमालाच्या प्रश्नावर नकाराधिकाराचा वापर केला. सुरक्षा परिषदेमध्ये कधी अमेरिकेचे तर कधी सोव्हिएट रशियाचे पारडे जड होते. ज्या वेळी सुरक्षा परिषदेत सोव्हिएट रशिया अल्पमतात आला त्या वेळी सोव्हिएट रशियाने नकाराधिकार वापरला. सन १९४५ ते १९६० या काळात सोव्हिएट रशिया अल्पमतात आल्याने त्याच्याकडून नकाराधिकाराचा सर्वाधिक वापर झाला. सन १९८० ते १९९० या काळात अमेरिका अल्पमतात आल्याने अमेरिकेकडून सर्वाधिक वेळा नकाराधिकाराचा वापर झाला.

पाच कायम सदस्यांशिवाय सुरक्षा परिषदेमध्ये दहा हंगामी सदस्य आहेत



ज्यांची निवड दोन वर्षांसाठी केली जाते. या दहा सदस्यांची निवड आमसभेकडून केली जाते. या सदस्यांना नकाराधिकार देण्यात आलेला नाही. त्यांना ठरावांवर मतदानाचा अधिकार आहे. सुरक्षा परिषदेतील कोणताही ठराव मंजूर होण्यासाठी नऊ मतांची आवश्यकता असते. अर्थात बहुमताने ठराव मंजूर झाला तरी कायम सदस्य राष्ट्रे नकाराधिकार वापरून ठरावाला खीळ घालू शकतात. सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद एका महिन्यासाठी सदस्यांमध्ये आलटून-पालटून बदलले जाते. संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालय न्यूयॉर्क येथे सुरक्षा परिषदेच्या नियमित बैठका होतात.

**यूएनच्या घटनेतील प्रकरण सहा (VI) आणि सात (VII)**

यूएनच्या घटनेतील प्रकरण सहा आणि प्रकरण सात ही आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे हे यूएनचे प्रमुख उद्दिष्ट आहे आणि जबाबदारी सुरक्षा परिषदेवर टाकण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या संघर्षाचा सामना कसा करायचा याविषयीचे मार्ग प्रकरण सहा आणि सातमध्ये नमूद करण्यात आले आहेत. प्रकरण सहामध्ये सुरक्षा परिषदेसाठी शांततापूर्ण मार्गाने संघर्ष सोडविण्याचे मार्ग नमूद करण्यात आले आहेत (To encourage, assist and recommend actions that call for peaceful solutions to a dispute). प्रकरण सातमध्ये आंतरराष्ट्रीय शांततेला धोक्यात आणणारे कृत्य, आव्हानांचा सामना कशा प्रकारे केला जावा त्याविषयी तरतूद आहे. (Action with respect to threats to the peace, breaches to the peace and acts of aggression) अशा प्रसंगी आर्थिक निर्बंधांपासून तर सशस्त्र कारवाईपर्यंत कोणत्याही कारवाईचा निर्णय परिस्थितीनुरूप सुरक्षा परिषद घेऊ शकते.

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याची प्राथमिक जबाबदारी सुरक्षा परिषदेवर असली आणि प्रस्थापित आंतरराष्ट्रीय रचनेला (Established International Order) धोका पोहचविणाऱ्या राष्ट्राविरुद्ध कारवाई करण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला असला तरी सुरक्षा परिषदेच्या ठरावांवर आणि निर्णयांवर मर्यादा आणणारे काही घटक आहेत. त्यापैकी (अ) राष्ट्रीय सार्वभौमत्व (ब) राष्ट्रीय हितसंबंध हे दोन घटक महत्त्वाचे आहेत. आपल्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याविषयीच्या कोणत्याही निर्णयाच्या अंमलबजावणीविषयी राष्ट्रे उदासीन



...nand College of Arts... Acc. No... 16761

कायमस्वरूपी राष्ट्रांची सहमती असणे आवश्यक आहे. अशा सहमतीअभावी सुरक्षा परिषद कारवाई करू शकत नाही. (सिडनेबेली, सॅमडॉज, १९९८ : २२-३२)[१]

**सुरक्षा परिषदेची संघर्ष व्यवस्थापनाची कार्यपद्धती**

राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्ष सोडवून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा टिकविणे हे सुरक्षा परिषदेचे प्रमुख कार्य आहे. हे कार्य सुरक्षा परिषद दोन प्रकारे पार पाडते.

अ) ज्या वेळी दोन राष्ट्रांमधील संघर्षाची परिस्थिती निर्माण होते, त्या वेळी त्या राष्ट्रांमधील प्रश्न चर्चा आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडविण्यासाठी सुरक्षा परिषद खालील मार्ग वापरते.

१) वाटाघाटी घडवून आणणे.

२) चौकशीचे आदेश देणे.

३) चौकशी घडवून आणणे.

४) मध्यस्थी करणे.

५) सामोपचाराने प्रश्न सोडविणे.

६) लवाद नेमणे.

७) विभागीय संघटनांची मदत घेणे.

ब) ज्या वेळी दोन राष्ट्रांमधील संघर्षातून विभागीय अथवा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली असेल; त्या वेळी सुरक्षा परिषद दंडात्मक कारवाईचा निर्णय घेऊ शकते. या दंडात्मक कारवाईत आर्थिक बहिष्कारापासून ते प्रत्यक्ष लष्करी हस्तक्षेपापर्यंतच्या मार्गांचा समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे अथवा नाही हे ठरविण्याचा पूर्ण अधिकार सुरक्षा परिषदेला आहे. या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे ज्या गोष्टी किंवा जे विषय सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गत कारभाराशी निगडित आहेत त्या विषयांना गृहीत धरून राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्राला आहे अथवा नाही याविषयी संयुक्त राष्ट्राच्या घटनेत स्पष्ट तरतूद नाही.

**सुरक्षा परिषदेचे अधिकार आणि कार्ये :-**

(अ) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे हे सुरक्षा परिषदेचे प्राथमिक आणि प्रमुख कार्य आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता

टिकविण्यासाठी आक्रमक राष्ट्राविरोधी आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला आहे. त्यामध्ये लष्करी कारवाईपासून तर आर्थिक आणि व्यापारी निर्बंधांपर्यंतच्या सर्व अधिकारांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणारे राष्ट्र कोणते आणि त्या राष्ट्राविरुद्ध कशा स्वरूपाची कारवाई करायला हवी, याविषयी निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार सुरक्षा परिषदेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रसंघात हा अधिकार प्रत्येक सदस्य राष्ट्राला बहाल करण्यात आला होता. अशा प्रसंगी सामूहिक सुरक्षिततेचे तत्त्व प्रत्यक्षात येणे अवघड बनते. कारण अशावेळी राष्ट्रांमध्ये आक्रमक राष्ट्राविषयी सहमती घडवून आणने अवघड असते.

(ब) सुरक्षा परिषदेच्या अनुमोदनावर नवीन सदस्यांना संयुक्त राष्ट्रात प्रवेश दिला जातो. संयुक्त राष्ट्राच्या सदस्यत्वाची विशिष्ट अशी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत तीन टप्पे आहेत. (१) सदस्यत्वासाठी इच्छूक राष्ट्र शांतताप्रिय आणि यूएनच्या घटनेशी वचनबद्ध असायला हवे. (२) सुरक्षा परिषदेचे अनुमोदन. (३) आमसभेचे दोन तृतीयांश बहुमत. सुरक्षा परिषदेच्या अनुमोदनाशिवाय कोणत्याही राष्ट्राला यूएनचे सदस्य बनता येत नाही. सुरक्षा परिषदेचे पाच कायम सदस्य एखाद्या राष्ट्राच्या सदस्यत्वाच्या प्रश्नावर नकाराधिकाराचा वापर करू शकतात. शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएट रशियाकडून सदस्यत्वाच्या प्रश्नावरून नकाराधिकाराचा वापर अनेकदा झाला.

(क) आंतरराष्ट्रीय न्यायालयातील (International Court of Justice) न्यायाधीशांच्या निवडीत सुरक्षा परिषदेची भूमिका महत्त्वाची आहे. सुरक्षा परिषद आणि आमसभा मिळून न्यायाधीशांची निवड करतात. न्यायाधीशांच्या निवडीसाठी सुरक्षा परिषद आणि आमसभेत स्वतंत्रपणे पण एकाच वेळी मतदान होते.

(ड) संयुक्त राष्ट्राच्या महासचिवांची निवड ही जरी आमसभेकडून होत असली तरी त्यासाठी सुरक्षा परिषदेचे अनुमोदन अवश्यक आहे. महासचिवाच्या नावावर पाचही कायमस्वरूपी राष्ट्रांचे एकमत असणे आवश्यक आहे.

(इ) सुरक्षा परिषद आंतरराष्ट्रीय न्यायालयाला राष्ट्रांमधील संघर्षाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय कायद्यातील एखाद्या तरतुदीविषयी सल्ला मागू शकते.

(ई) आर्थिक आणि सामाजिक परिषदेकडून मदत घेण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला आहे.

(उ) सुरक्षा परिषदेकडून आमसभेला काही विशेष वार्षिक अहवाल सादर केले जातात.



(ऊ) सुरक्षा परिषद राष्ट्रांमधील संघर्ष त्वरित थांबविण्याचा (Cease fire) आदेश देऊ शकते.

(ए) राष्ट्रांमधील संघर्षाविषयी, प्रश्नांविषयी, आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन झाले अथवा नाही याची शहानिशा करण्यासाठी सुरक्षा परिषद चौकशी आयोग नेमू शकते.

(ऐ) २००२ साली अस्तित्वात आलेल्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाकडे सुरक्षा परिषद एकदा संघर्ष चौकशीसाठी सोपवू शकते. (देवळाणकर शैलेंद्र, २००८ : ७२-७९)[१०]

**हंगामी लवाद नेमण्याचा अधिकार**

यूएनच्या घटनेतील दहाव्या प्रकरणातील कलम २९ नुसार सुरक्षा परिषदेला आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याच्या आपल्या कार्यात मदतीसाठी हंगामी लवाद (Ad hoc Tribunals) नेमण्याचा अधिकार आहे. या लवादांना न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असून त्यांचे निर्णय संबंधित राष्ट्रांवर बंधनकारक असतात. संबंधित राष्ट्रांना या लवादांना सहकार्य करावे लागते. शीतयुद्धोत्तर काळात दोन महत्त्वाचे लवाद सुरक्षा परिषदेकडून नेमले गेले- (अ) पूर्वीच्या युगोस्लोव्हियासाठी नेमण्यात आलेला आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी लवाद (International Criminal Tribunal for the Former Yugoslavia) आणि (ब) रवांडा या आफ्रिकन देशासाठी नेमण्यात आलेला आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी लवाद (International Criminal Tribunal for Rwanda) (उमेश कदम, २००१ : ९-१२)[११] वंशसंहार, मानवतावादा विरोधी गुन्हे आणि युद्धगुन्ह्यांच्या संदर्भात असे लवाद नेमले जातात. या लवादांना संबंधित राष्ट्रामध्ये जाऊन चौकशीचे, पुरावे तपासण्याचे आणि त्यानुसार न्यायनिवाडा करण्याचे अधिकार आहेत.

## ३) आर्थिक आणि सामाजिक परिषद

यूएनच्या सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी सक्रिय असणारा घटक म्हणजे आर्थिक आणि सामाजिक परिषद. संयुक्त राष्ट्राची निर्मिती केवळ जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून वाचविण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय शांतता-सुरक्षितता टिकविण्यासाठी झालेली नाही तर त्याचबरोबर सदस्य राष्ट्रांचा आर्थिक आणि सामाजिक विकास साधणे हादेखील यूएनच्या स्थापनेमागचा महत्त्वाचा उद्देश आहे आणि हे कार्य आर्थिक आणि सामाजिक परिषदेकडून पार पडते. आर्थिक आणि सामाजिक प्रगती ही शांतता आणि सुरक्षेची पूर्वअट आहे. आर्थिक आणि सामाजिक प्रगतीशिवाय सुरक्षितता टिकणार नाही.

अशा स्वरूपाच्या प्रगतीसाठी सर्व सदस्य राष्ट्रांचे सहकार्य अवश्यक आहे. संयुक्त राष्ट्राच्या घटनेतील पहिल्याच कलमात स्पष्ट करण्यात आले आहे, की "To achieve cooperation among the nations in solving the problems of social, economical, cultural and humanitarian nature" हे यूएनचे महत्त्वाचे उद्दिष्ट असेल. सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्य निर्माण करून विकास साधण्याचे हे कार्य आर्थिक आणि सामाजिक समिती करते. आंतरराष्ट्रीय समुदायाला आर्थिक आणि सामाजिक असुरक्षिततेपासून मुक्त करण्याची जबाबदारी आर्थिक आणि सामाजिक समितीची आहे. (वॉल्टर शार्प, १९६९ : ८-१३)[१२] आर्थिक आणि सामाजिक समितीच्या स्थापनेची तीन प्रमुख उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे यूएनच्या घटनेच्या कलम ५५ मध्ये नमूद करण्यात आली आहेत-

(१) सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासह उच्च जीवनस्तर, संपूर्ण रोजगार ही उद्दिष्टे साधण्यासाठी प्रयत्न.

(२) आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक समस्या सोडविणे त्याचबरोबर शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रगतीसाठी सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्य साधणे.

(३) मानव अधिकारांच्या रक्षणाची जाणीव सदस्य राष्ट्रांमध्ये निर्माण करून त्या अधिकारांविषयी आदर निर्माण करणे.

यूएनच्या आमसभेच्या मार्गदर्शनाखाली आणि सल्ल्याने सामाजिक आणि आर्थिक समिती या जबाबदाऱ्या पार पाडेल असे यूएनच्या घटनेत स्पष्ट करण्यात आले आहे.

सामाजिक आणि आर्थिक समितीत ५४ सदस्य आहेत. संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी ही सदस्य संख्या १८ होती. पुढे १९६६ आणि १९७३ साली घटनादुरुस्तीद्वारे त्यात वाढ करून ती ५४ वर नेण्यात आली. (सिम्मा, ब्रुनो, २००२ : १३६७)[१३] यूएनच्या सर्व सदस्य राष्ट्रांना योग्य प्रतिनिधित्व सामाजिक आणि आर्थिक समितीवर मिळावे या उद्देशाने सदस्यसंख्या वेळोवेळी वाढविण्यात आली. या सदस्यांची निवड तीन वर्षांच्या कालावधीसाठी आमसभेकडून होते. सदस्यांना पुनर्नियुक्तीची सुविधा आहे, सामाजिक आणि आर्थिक समिती आपले कार्य विविध आयोग, स्थायी समित्या, हंगामी समित्यांमार्फत पार पाडते. या समित्या आणि आयोग आमसभेत आपले अहवाल सादर करतात. समितीच्या आधिपत्याखाली कार्य करणारे आयोग दोन प्रकारचे असतात- (अ) कार्यकारी आयोग :- वित्तीय आणि रोजगार आयोग, मानव अधिकार आयोग (आता या आयोगाची जागा मानव अधिकार सभेने घेतली आहे), लोकसंख्या आयोग, महिला आयोग. (ब) विभागीय आयोग :- युरोप, आशिया, लॅटिन अमेरिका यांसारख्या भौगोलिक विभागांसाठीचे आर्थिक आयोग. आर्थिक आणि सामाजिक समितीची वर्षातून दोनदा बैठक होते. याशिवाय वेळप्रसंगी विशेष बैठका बोलाविल्या जातात. बैठकांचे पर्यवेक्षण अध्यक्षांकडून होते आणि अध्यक्षांची निवड दरवर्षी होते. समितीतील प्रत्येक निर्णय हा साध्या बहुमताने घेतला जातो. प्रत्येक सदस्याला एक मत असते.

**आर्थिक आणि सामाजिक समितीचे कार्य आणि भूमिका :-**

(१) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य आदी क्षेत्रांमध्ये विकासासाठी अध्ययन, संशोधन करणे आणि त्यासंबंधी उपाययोजना करण्यासाठी आमसभेला अहवाल सादर करणे.

(२) विकासाच्या प्रश्नांसंबंधी आमसभेला आणि यूएन अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध संस्था, संघटनांना शिफारशी करणे.

(३) आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी विविध आयोगांची स्थापना करणे.

(४) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य आदी प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी, विचारांचे आदान-प्रदान करण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे.

(५) सुरक्षा परिषदेला वेळोवेळी आवश्यक ती माहिती पुरविणे.

(६) आर्थिक आणि सामाजिक समितीच्या आधिपत्याखाली कार्य करणाऱ्या १५ विशेष संस्थांच्या (Specialised Agencies) कार्याचे समन्वय करणे, त्यांच्याकडून अहवाल स्वीकारणे.

(७) मानव अधिकारांच्या रक्षणाची जाणीव वैश्विक करण्यासाठी, मानव अधिकारांविषयी आदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे.

(८) आमसभेला वार्षिक अहवाल सादर करण्याबरोबरच आमसभेकडून वेळप्रसंगी मागविण्यात आलेली माहिती पुरविणे. यूएनच्या घटनेतील कलम ६६ नुसार आमसभा काही इतरही जबाबदाऱ्या आर्थिक आणि सामाजिक समितीवर टाकू शकते. त्यांची पूर्तता आर्थिक आणि सामाजिक समितीला करावी लागते.

आर्थिक आणि सामाजिक समितीने सुरवातीच्या काळात दुसऱ्या महायुद्धाची झळ पोहचलेल्या राष्ट्रांमध्ये विशेषत: युरोपियन राष्ट्रांमध्ये यूएनकडून मदत आणि पुनर्रचनेचे जे कार्य होत होते, त्याचे समन्वयन केले. समितीची सदस्यसंख्या सन

१९६० आणि १९७० च्या दशकात वाढण्याबरोबरच कार्यांची व्याप्तीही वाढली. आशिया, आफ्रिका खंडातील गरीब राष्ट्रांमधील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आदी समस्यांचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना करण्यास समितीने प्रारंभ केला. गरीब आणि अविकसित राष्ट्रांमधील बेरोजगार, उपासमार, वाढती गुन्हेगारी, महिला आणि लहान मुलांचे प्रश्न, कुपोषण, निम्न जीवनस्तर, व्यसनाधीनता, शहरीकरण, वाढत्या लोकसंख्येबरोबरच निर्माण होणारे प्रश्न यांवर आर्थिक आणि सामाजिक परिषदेने लक्ष केंद्रीत केले. या कार्यासाठी समितीकडून विशेष आयोग स्थापन केले गेले. आशिया, आफ्रिका, उत्तरपूर्व आशिया, लॅटिन अमेरिका यांसारख्या भौगोलिक विभागांच्या आर्थिक विकासासाठी प्रादेशिक आर्थिक आयोग समितीकडून स्थापले गेले. मानव अधिकारांच्या प्रसारात आणि त्याविषयी आदर वाढविण्यात समितीचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर कामगारांचे प्रश्न सोडविण्यातही समितीचे योगदान महत्त्वाचे आहे. शीतयुद्धाच्या राजकारणाचा प्रभाव आर्थिक आणि सामाजिक समितीच्या कार्यावरही पडला. अनेकदा समितीवर युरोपियन राष्ट्रांना झुकते माप दिले जात असल्याचाही आरोप झाला.

**आर्थिक आणि सामाजिक समितीचे योगदान**

आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर अध्ययन, संशोधन आणि शिफारशी करण्यासाठी तसेच मानवतावादी मूल्यांच्या प्रसारासाठी आर्थिक आणि सामाजिक समिती सक्रिय आहे. आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांवर संयुक्त राष्ट्र संघाअंतर्गत कार्य करणारी ही मध्यवर्ती समिती आहे.

या समितीच्या पुढाकाराने मानव अधिकार, पर्यावरण, लोकसंख्या, महिलांचे अधिकार यांसारख्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या प्रश्नांवर विश्व परिषदा (Global Conferences) आयोजित केल्या गेल्या.

आर्थिक आणि सामाजिक समितीची सक्रिय असणाऱ्या दीड हजाराहून अधिक बिगर शासकीय संघटनांच्या मदतीने आर्थिक आणि सामाजिक सभा आपले कार्य पार पाडते.

आर्थिक आणि सामाजिक समितीची मूळ सदस्यसंख्या १८ होती. सन १९६५ आणि १९७३ साली अशी दोनदा यूएनच्या घटनेत दुरुस्ती करून या समितीची सदस्यसंख्या १८ वरून ५४ एवढी करण्यात आली. आर्थिक आणि

## ५) आंतरराष्ट्रीय न्यायालय

आंतरराष्ट्रीय न्यायालय ही संयुक्त राष्ट्राची प्रमुख शाखा असून १८ एप्रिल १९४६ ला या न्यायालयाची स्थापना करण्यात आली. या न्यायालयाने राष्ट्रसंघाअंतर्गत असणाऱ्या आंतरराष्ट्रीय न्यायासाठी कायमस्वरूपी न्यायालयाची (Permanent Court of International Justice) जागा घेतली. राष्ट्रसंघाअंतर्गत कार्य करणारे कायमस्वरूपी आंतरराष्ट्रीय न्यायालय एक स्वायत्त संस्था होय. तथापि संयुक्त राष्ट्राअंतर्गत कार्य करणारे सध्याचे आंतरराष्ट्रीय न्यायालय यूएनचा एक प्रमुख घटक किंवा अंग (Principal Organ) आहे. या न्यायालयाची आपली घटना (Statute) असून त्यानुसार हे न्यायालय कार्य करते. या घटनेला सॅन फ्रॅन्सिस्को परिषदेत मान्यता देण्यात आली. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे मुख्यालय नेदरलँडमधील हेग येथे आहे. या न्यायालयाचा मुख्य उद्देश (१) यूएनपुढे येणारे कायदेशीर प्रश्न सोडविणे (२) यूएनच्या ज्या सदस्य राष्ट्रांनी आपले संघर्ष न्यायालयापुढे मांडले आहेत, ते सोडविण्याचा प्रयत्न करणे. (३) सुरक्षा परिषद किंवा आमसभेने कायदेशीर सल्ला मागितल्यास त्यांना तो देणे.

संयुक्त राष्ट्राअंतर्गत एक नवीन आंतरराष्ट्रीय न्यायालय प्रस्थापित केले जावे ही कल्पना डबंरटोन ओक्स प्रस्तावामध्ये होती. सन १९४५च्या याल्टा परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची घटना तयार करण्यासाठी पावले उचलण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार आंतरराष्ट्रीय न्यायालयाची जी घटना तयार करण्यात आली; त्यावर १९४५ मध्ये सॅन फ्रॅन्सिस्को परिषदेत चर्चा झाली. उपस्थित राष्ट्रांची मान्यता मिळून आंतरराष्ट्रीय न्यायालय अस्तित्वात आले. यूएनच्या घटनेतील कलम ९२ नुसार स्पष्ट करण्यात आले आहे, की आंतरराष्ट्रीय न्यायालय ही यूएनची महत्त्वाची शाखा असून न्यायालयाच्या घटनेच्या चौकटीत ती कार्य करेल. राष्ट्राला आपले संघर्ष, प्रश्न, समस्या या आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडून सोडवून घेणे जरी बंधनकारक नसले तरी जेव्हा ते न्यायालयात खटला दाखल करतात तेव्हा न्यायालयाचा निवाडा मान्य करणे राष्ट्रांवर बंधनकारक आहे. संयुक्त राष्ट्राचे सर्व सदस्य हे आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सदस्य आहेत. किंबहुना हे सदस्यत्व त्यांना आपोआपच प्राप्त होते. जी राष्ट्रे यूएनची सदस्य नाहीत; त्यांनाही आमसभा आणि सुरक्षा परिषदेने ठरविलेल्या अटींनुसार न्यायालयाचे सदस्य बनता येते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेला बांधिल राहण्याचे आणि न्यायालयाच्या निवाड्याचा आदर करण्याचे प्रत्येक सदस्य राष्ट्राला मान्य करावे लागते. राष्ट्रे आंतरराष्ट्रीय कायद्याशी निगडित प्रश्न, विशिष्ट आंतरराष्ट्रीय करारातील तरतुदींचे स्पष्टीकरण आणि त्याशी संबंधित प्रश्न



आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडून सोडवून घेऊ शकतात. यूएनची सदस्य राष्ट्रे परस्परांमधील द्विपक्ष अथवा बहुपक्षपातळीवरील संघर्ष सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय न्यायालयाशिवाय इतर माध्यमांचा आधार घेऊ शकतात. आंतरराष्ट्रीय न्यायालयाबाबत खालील गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

(१) आंतरराष्ट्रीय न्यायालयात केवळ राष्ट्रांवर खटले चालतात, व्यक्तींवर नाही.

(२) न्यायालयाने दिलेला निवाडा हा केवळ संबंधित राष्ट्रांवरच बंधनकारक असतो.

(३) न्यायालयाने दिलेल्या निवाड्याचे पालन जर एखाद्या राष्ट्राकडून होत नसेल तर दुसरे राष्ट्र ही बाब सुरक्षा परिषदेच्या लक्षात आणून देते आणि सुरक्षा परिषद त्यावर कशा प्रकारची कारवाई करायची हे ठरविते.

(४) आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निवाडा हा अंतिम स्वरूपाचा असतो, त्याविरुद्ध दुसरीकडे दाद मागता येत नाही.

(५) आंतरराष्ट्रीय कायद्यातील एखाद्या तरतुदीविषयी किंवा एखाद्या कायदेशीर प्रकरणाविषयी सुरक्षा परिषद अथवा आमसभेने आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे सल्ला किंवा मत (Advisory Opinion) मागितल्यास ते देण्याचा अधिकार आंतरराष्ट्रीय न्यायालयाला आहे.

(६) आंतरराष्ट्रीय न्यायालय Voluntary Jurisdiction या तत्त्वावर आधारलेले आहे. संघर्षातील पक्षांनी सहमतीने न्यायालयात खटला दाखल केल्यावर न्यायालय त्यावर निवाडा देते. खटला दाखल करणे सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक नाही. न्यायालयात जे खटले दाखल केले जातात त्यावरच न्यायालय निर्णय देते.

(७) आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेतील कलम ३६ नुसार आंतरराष्ट्रीय कायद्याशी संबंधित प्रश्नाविषयी किंवा आंतरराष्ट्रीय करारातील तरतुदीचा अर्थ लावण्याविषयीचा अंतिम अधिकार हा आंतरराष्ट्रीय न्यायालयाला असेल. यासंबंधी न्यायालयाने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(८) आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय हा संबंधित राष्ट्रांवर बंधनकारक असतो. असे असले तरी निर्णयाच्या अंमलबजावणीची स्वतंत्र अशी यंत्रणा आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेत नाही. तथापि जेव्हा एखादे राष्ट्र अंमलबजावणीसाठी तयार नसते, तेव्हा कलम ९४(२) नुसार सुरक्षा परिषदेला कारवाईचा अधिकार आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायालयात १५ न्यायाधीशांचा समावेश असून त्यांची निवड आमसभा आणि सुरक्षा परिषदेद्वारे निवडणूक पद्धतीने होते. दोन्ही शाखांमध्ये एकाच वेळी पण स्वतंत्रपणे मतदान होते. न्यायाधीशांची निवड नऊ वर्षांसाठी होते. दर तीन वर्षांनी १/३ जागा भरल्या जातात. न्यायाधीशांची संख्या नुकतीच १५ वरून १६ करण्यात आली आहे. न्यायाधीशांमधूनच एकाची अध्यक्षपदासाठी आणि एकाची उपाध्यक्षपदासाठी निवड केली जाते. ही निवड तीन वर्षांसाठी होते. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील सर्व निर्णय हे साध्या बहुमताने घेतले जातात. ज्या वेळी मतांची बरोबरी होते; त्या वेळी निर्णायक मत (Casting Vote) टाकण्याचा अधिकार अध्यक्षाचा असतो.

**आंतरराष्ट्रीय न्यायालय : थोडक्यात महत्त्वाचे**

- संयुक्त राष्ट्राचे सर्व सदस्य आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सदस्य आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायालय केवळ राष्ट्रांमधील संघर्ष सोडविते. व्यक्ती या न्यायालयाच्या सदस्य बनू शकत नाही आणि कोणत्याही व्यक्तीवर या न्यायालयात खटला चालत नाही.
- आंतरराष्ट्रीय न्यायालयाला सल्ला देण्याचा जरी अधिकार असला तरी केवळ यूएनची इतर पाच घटक अंगेच (जसे आमसभा, सुरक्षा परिषद) असा सल्ला मागू शकतात. यूएनच्या सदस्य राज्यांना असा सल्ला मागण्याचा अधिकार नाही. गेल्या साठ वर्षांत आंतरराष्ट्रीय न्यायालयाने चोवीस वेळा असा सल्ला (Advisory Opinion) दिला आहे.
- आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढे चाललेल्या काही खटल्यांपैकी अमेरिका आणि कॅनडामधील, फिनलँड आणि डेन्मार्कमधील, लिबिया आणि याल्टामधील संघर्षाविषयीचे खटले महत्त्वपूर्ण आहेत. गेल्या साठ वर्षांत आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ७६ खटल्यांमध्ये न्यायनिवाडा (Judgements) दिला आहे.
- आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढे येणाऱ्या संघर्षांपैकी बहुतांश संघर्ष सीमावाद, समुद्रसीमा निर्धारित करणे, आर्थिक आणि व्यापारी स्वरूपाचे अधिकार, राष्ट्रीयत्वाचा प्रश्न, आश्रयाचा अधिकार (Right of asylum) यांच्याशी संबंधित आसतात.
- सन १९९३ साली आंतरराष्ट्रीय न्यायालयाअंतर्गत पर्यावरणाशी संबंधित खटले चालविण्यासाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला आहे.



## ६) महासचिव आणि सचिवालय

सचिवालयामार्फत संयुक्त राष्ट्राचा दैनंदिन प्रशासकीय कारभार चालविला जातो. सचिवालयात पाच हजारांच्यावर कर्मचारी वर्ग आहे. सचिवालयाचे प्रमुख म्हणून महासचिव काम पाहतात. महासचिव हे यूएनचे मुख्य प्रशासकीय अधिकारी आहेत, यूएनच्या सर्व कार्यांवर देखरेख ठेवण्याचे आणि त्या कार्यांत समन्वय साधण्याचे कार्य सचिवालयाकडून होते. सचिवालयाच्या कर्मचारी वर्गात अनेक उपमहासचिव, प्रशासकीय अधिकारी, सहाय्यक, विशेषज्ञ यांचा समावेश असतो. या सर्व कर्मचारीवर्गाची नेमणूक महासचिवांकडून आमसभेने ठरवून दिलेल्या नियमांनुसार होत असते. सचिवालयात अनेक विभाग करण्यात आलेले असून त्यांचे नेतृत्व उपमहासचिवांकडे (Deputy Secretary Generals) असते.

सचिवालयाचा मुख्य प्रशासकीय अधिकारी या नात्याने महासचिवाचे कार्यक्षेत्र व्यापक आहे. महासचिव सचिवालयाचा मुख्य समन्वयक आहे. सचिवालयाच्या कार्यावर देखरेख ठेवण्याबरोबरच यूएनच्या घटनेने निर्धारित केलेली कार्ये महासचिवाकडून पार पाडली जातात. महासचिवाची नेमणूक सुरक्षा परिषदेच्या शिफारशीवरून आमसभेकडून होते. महासचिवाचे उमेदवारांची नावे निर्धारित करण्यासाठी सुरक्षा परिषदेची विशेष बैठक आमंत्रित केली जाऊ शकते. सुरक्षा परिषदेने महासचिवाच्या पदासाठी ज्या नावाची शिफारस केली आहे ते नाव नाकारण्याचा अधिकार आमसभेला आहे. अशा वेळी सुरक्षा परिषद नवीन नावाचा विचार करू शकते. तथापि आमसभा सुरक्षा परिषदेची शिफारस धुडकावून स्वत: महासचिवाच्या पदासाठी नाव सुचवू शकत नाही. नाव सुचविण्याचा विशेषाधिकार केवळ सुरक्षा परिषदेलाच आहे. सुरक्षा परिषदेकडून नावांची शिफारस झाल्यानंतर आमसभा गुप्त मतदान पद्धतीने त्यापैकी एकाची महासचिव म्हणून निवड करते. या पदाच्या निवडणुकीसाठी आमसभेच्या विशेष बहुमताची आवश्यकता नसते. जेवढे सदस्य उपस्थित आहेत; त्यांपैकी साध्या बहुमताने महासचिवाची निवड केली जाते. महासचिवाची निवड ही पाच वर्षांसाठी केली जाते. कालावधी संपल्यानंतर पुनर्नियुक्तीची तरतूद आहे. एकाच व्यक्तीची दुसऱ्यांदा महासचिवपदासाठी निवड होऊ शकते. त्याचबरोबर महासचिवपदाचा कालावधी वाढविण्याचा देखील आमसभेला अधिकार आहे. यूएनच्या पहिल्या महासचिवांचा कालावधीत तीन वर्षांनी वाढविण्यात आली होती.

### महासचिवांची भूमिका

- यूएनच्या महासचिवांची भूमिका संकटप्रसंगी अथवा आणीबाणीच्या प्रसंगी

राजनयाच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याच्या कार्यात अधिक आहे. अशा प्रसंगी महासचिव मध्यस्थाची भूमिका करतात. महासचिवांचे कार्यालय आणि सचिवालयातील कर्मचारी संघर्षातील पक्षांना राजनयाच्या, वाटाघाटीच्या माध्यमातून संघर्ष सोडविण्यासाठी मदत करतात.

• महासचिवांचे आणि सचिवालयातील इतर कर्मचाऱ्यांचे प्राथमिक कार्य यूएनच्या सदस्य राष्ट्रांना त्यांच्या कार्यात मदत करण्याचे आहे.

• महासचिवांची भूमिका ही केवळ प्रशासकाची नाही तर त्यांची राजकीय भूमिकादेखील तेवढीच महत्त्वाची आहे. यूएनच्या घटनेतील कलम ९९ नुसार एखादा महत्त्वाचा, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका पोहचवणारा प्रश्न सुरक्षा परिषदेपुढे आणण्याचा, सुरक्षा परिषदेचे त्या प्रश्नाकडे लक्ष आकर्षित करण्याचा अधिकार महासचिवांना आहे. परिणामी यूएनच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्याचा मार्ग मोकळा होतो.

• यूएनची नि:पक्षपाती प्रतिमा टिकविण्याचे कार्य महासचिवांना करावे लागते. मोठ्या राष्ट्रांचे हितसंबंध न दुखावता लहान राष्ट्रांच्या यूएनवरील विश्वास टिकविण्याची कसरत महासचिवांना करावी लागते. लहान-मोठ्या राष्ट्रांमधला समतोल साधण्याची जबाबदारी महासचिवांची आहे. (रमेश ठाकूर, २०००)[१४]

यूएनच्या घटनेतील कलम ९८ नुसार महासचिव आमसभेला एक वार्षिक अहवाल सादर करतात. हा अहवाल वर्षभरात यूएनने केलेल्या कार्याविषयी आणि भविष्यातील यूएनच्या योजनांविषयी असतो. अशा अहवालांमुळे यूएनच्या भविष्यातील वाटचालीची दिशा निर्धारित होते. यूएनचे माजी महासचिव बुत्रोस घाली यांनी शीतयुद्धोत्तर काळात यूएनचा वाटचालीसंबंधी "An Agenda for Peace" आणि "An Agenda for Development" असे दोन अहवाल आमसभेला सादर केले. (बुत्रोस बुत्रोस घाली, १९९२, १९९५)[१५] त्यामध्ये शीतयुद्धोत्तर आव्हानांचा आणि त्यावरील उपाययोजनांचा तपशील देण्यात आला होता. यूएनला २१ व्या शतकात सामना कराव्या लागणाऱ्या आव्हानांचा आणि त्यावरील उपाययोजनांचा सर्वसमावेशक आढावा घेणारा अहवाल यूएनचे माजी महासचिव कोफी अन्नान यांनी २००० साली आमसभेपुढे मांडला. हा अहवाल "We the People : The Role of United Nations in the 21st Century" या नावाने ओळखला जातो.



### संयुक्त राष्ट्राचे बजेट

संयुक्त राष्ट्राचे सन २००० पर्यंत एकूण बजेट हे २५३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स एवढे होते. (मर्जोरी ब्राऊन, ब्लेंचफिल्ड, २००६)[१६] संयुक्त राष्ट्राला स्वतःचे, उत्पन्नाचे साधन नाही. परिणामी सर्व सदस्य राष्ट्रांकडून मिळणाऱ्या निधीतून यूएनला आपला खर्च भागवावा लागतो. प्रत्येक राष्ट्राने किती निधी द्यावा याविषयी निर्णय घेण्याचे, नियम बनविण्याचे कार्य आमसभा करते. एखाद्या राष्ट्राने किती निधी द्यावा हे ठरविताना आमसभा त्या राष्ट्राच्या आर्थिक क्षमतेचा विचार करते. शीतयुद्धोतर काळात यूएनचे बजेट वाढल्याचे दिसते. त्यामागचे प्रमुख कारण यूएनची विशेषतः यूएनच्या शांतिसैनिकांची विस्तारलेली भूमिका कारणीभूत आहे. यूएनने १९४५ ते १९९० या काळात जेवढ्या शांतिसैनिक मोहिमा राबविल्या त्यापेक्षा अधिक मोहिमा या १९९१ ते २००८ या काळात राबविल्या गेल्या आहेत. शांतिसैनिक मोहिमांवर होणारा खर्च हा सन २००० पर्यंत २ अब्ज अमेरिकन डॉलर एवढा होता. शांतिसैनिक मोहिमांसाठी अधिकच्या निधीची तरतूद ही सुरक्षा परिषदेच्या पाच कायम सदस्य राष्ट्रांनी करावी अशी तरतूद आहे. या पाच सदस्यांपैकी अमेरिकेसारखे राष्ट्र असा निधी उपलब्ध करून देण्यात उदासीन असल्याचे दिसते. परिणामी अमेरिकेकडे मोठी थकबाकी राहिली आहे. यूएनच्या एकूण बजेटचा आढावा घेतल्यास असे जाणवते की गेल्या दीड दशकात उत्पन्नापेक्षा खर्च अनेक पटीने वाढला आहे. खर्च वाढण्यामागे यूएनची विस्तारलेली भूमिका जबाबदार आहे. तर उत्पन्न कमी होण्यामागे सदस्य राष्ट्रांकडून वेळेवर निधी न दिला जाणे हे प्रमुख कारण आहे.

या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागेल आणि ती म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेला साठ वर्षे उलटून गेलेली असतानाही राष्ट्रे आपल्या स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी संयुक्त राष्ट्रापेक्षा आपल्या लष्करी सामर्थ्यावर अधिक विश्वास ठेवतात. जर राष्ट्रांनी आपला संरक्षणावरचा खर्च एक टक्क्याने जरी कमी केला आणि वाचलेला तेवढा पैसा निधीच्या रूपाने यूएनला दिला, तरी यूएनला कधीही आर्थिक टंचाईचा सामना करावा लागणार नाही आणि यूएन स्वतःचे सैन्य उभे करू शकेल. अशा सैन्याच्या माध्यमातून राष्ट्रांना आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करता येईल.

## संयुक्त राष्ट्रांतर्गत कार्यरत स्वायत्त संस्था

| | संस्था | मुख्यालय |
|---|---|---|
| (१) | आंतरराष्ट्रीय अणुशक्ती संस्था (IAEA) | व्हिएन्ना |
| (२) | विश्व आरोग्य संघटना (WHO) | जिनिवा |
| (३) | अन्न आणि कृषी संघटना (FAO) | रोम |
| (४) | कृषी विकासासाठीचा आंतरराष्ट्रीय निधी (IFAD) | रोम |
| (५) | आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) | जिनिवा |
| (६) | यूएनची शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO) | पॅरिस |
| (७) | औद्योगिक विकास संघटना (UNIDO) | व्हिएन्ना |
| (८) | आंतरराष्ट्रीय दूरसंदेश दळणवळण संघ (ITU) | जिनिवा |
| (९) | आंतरराष्ट्रीय पोस्टल संघ (IPU) | बर्न |
| (१०) | आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटना (ICAO) | मॉन्ट्रेल |
| (११) | आंतरराष्ट्रीय सागरी संघटना (IMO) | लंडन |
| (१२) | विश्व बौद्धिक संपदा संघटना (WIPO) | जिनिवा |
| (१३) | बहुपक्षीय गुंतवणूक हमी संघटना (MIGA) | वॉशिंग्टन |
| (१४) | आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) | वॉशिंग्टन |
| (१५) | आंतरराष्ट्रीय पुनर्निर्मिती आणि विकास बँक (विश्व बँक) (IBRD) | वॉशिंग्टन |
| (१६) | आंतरराष्ट्रीय विकास संघटना (IDA) | वॉशिंग्टन |
| (१७) | आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था (IFC) | वॉशिंग्टन |
| (१८) | विश्व व्यापार संघटना (WTO) | जिनिवा |

## संयुक्त राष्ट्राचे कार्यक्रम

(१) यूएनइपी- यूएन पर्यावरण कार्यक्रम UNEP
(२) यूएन आयसीइएफ- यूएन मुलांसाठीचा निधी UNICEF
(३) यूएन डी आर ओ- यूएन आपत्कालीन मदत समन्वयक कार्यालय
(४) यूएन एचसीआर- यूएन निर्वासितांसाठीचे उच्चायुक्त कार्यालय
(५) यूएन डीपी- यूएन विकास कार्यक्रम
(६) यूएन आयटीएआर- यूएन प्रशिक्षण आणि संशोधन संस्था
(७) यूएन आयएफइएम- यूएन महिलांसाठीचा निधी
(८) आयएनएसटीआरएडब्ल्यू- यूएन महिलांसाठी आंतरराष्ट्रीय संशोधन आणि
(९) यूएनसीटीएडी- यूएन व्यापार आणि विकास परिषद
(१०) डब्ल्यूएफपी- विश्व अन्न समिती
(११) यूएनएफपीए- यूएन लोकसंख्या निधी
(१२) यूएनयू- यूएन विश्वविद्यालय
(१३) यूएनडीसीपी- यूएन अंमलीपदार्थ नियंत्रण कार्यक्रम
(१४) आयटीसी- विश्व व्यापार केंद्र

**संदर्भ :**


1. Thomas Weiss, Forsythe, The United Nations and Changing World Politics (Oxford : West View Press, 1997) P. 30

2. Kegley Wittkof, World Politics, P. 163

3. Kegley Wittkof, World Politics (New York : St. Martin's Press) P. 176

4. James Sutterlin, "The Past as Prologue" in Bruce Russett, ed, The Once and Future Security Council (New York : St. Martin's Press, 1997) PP. 2-5

5. Kegley Wittkof, World Politics, P. 162

6. Joshua Goldstein, International Relations (New York : Longman 2002) P. 308